ePaper
| वर्ष - 7 । अंक -35 | UDYAM-MH-26-0158827 |
महाईन्यूज (TM)
लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!
www.mahaenews.com | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

## मोदींना वाटते, त्यांना देवापेक्षा जास्त कळते: राहुल गांधी



### आतील पानांत


- गौतमीवरुन वाद, पुण्यातले दोन पाटील एकमेकांना भिडले!
- सार्वजनिक पदपथच दिले चक्क भाडेतत्त्वावर!


# पिंपरी-चिंचवड स्मार्ट सिटीला बकालपणाचे ग्रहण!


ग्राऊंड रिपोर्ट



## » तुटलेल्या आणि लोंबकळणाऱ्या केबल नागरिकांच्या जिवावरही बेतण्याची शक्यता

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**शहरात कोणत्याही रस्त्याला जा, अथवा कोणत्याही गल्लीबोळात जा, तुम्हाला केबल लोंबकळत असल्याचे चित्र सर्रास पाहायला मिळेल! काही ठिकाणी अर्धवट तुटलेल्या तर काही ठिकाणी तुटून लटकलेल्या केबल दिसून येतात. काही कंपन्यांकडून विनापरवाना महापालिकेच्या विद्युत खांब, महापालिकेच्या विविध प्रभागातील इमारती मालमत्तेचा वापर केला आहे. तुटलेल्या आणि लोंबकळणाऱ्या केबलमुळे बकालपणा तर येतोच पण, त्या नागरिकांच्या जिवावरही बेतण्याची शक्यता निर्माण झाली आहे.**



पिंपरी-चिंचवड शहर हे ‘स्मार्ट’ बनत असतानाच, दुसरीकडे आकाशाकडे नजर टाकताच हे ‘केबल’चे जाळे निदर्शनास पडते आहे. महापालिका क्षेत्रात इंटरनेट तसेच इतर केबल टाकायच्या असतील, तर त्यासाठी संबंधित सेवा पुरवठादारांनी महापालिकेची परवानगी घेणे अपेक्षित आहे. मात्र, आतापर्यंत काही पुरवठादाराने महापालिकेची परवानगी घेतली नसल्याचे निदर्शनास येते. मुख्य रस्ते, अंतर्गत रस्ते, वृक्ष आणि विजेच्या खांबांवर या केबलच्या वायर सर्रासपणे संपूर्ण शहरभर टाकण्यात आल्या आहेत. खासगी इमारतीवर दूरदूरपर्यंत केबलच्या वायर टाकल्या आहेत.

याकडे प्रशासनाचे दुर्लक्ष होत आहे. त्यामुळे शहर बकाल होण्यास मदत होत आहे. शहराची सुंदरता धोक्यात आलेली आहे. महापालिकेचा कोट्यवधी रुपयांचा महसूलही काही खासगी कंपन्यांनी अनधिकृत केबल टाकून बुडविला आहे. काही कंपन्यांची चौकशी करून संबंधितांवर परवानगी न घेता केबल टाकल्याबद्दल व महापालिकेचा कोट्यवधी रुपयांचा महसूल बुडवल्याबद्दल त्यांच्यावर आकाशचिन्ह आणि विद्युत विभागाने कारवाई करणे गरजेचे आहे, अशी शहरातील सुजाण नागरिकांची मागणी आहे.

### तुटलेल्या केबलमुळे अपघाताची शक्यता

» भूमिगत केबल टाकण्यासाठी परवानगी मागितल्यास देण्यात येते. मात्र, संबंधित केबल पुरवठादारांनी शुल्क चुकविण्यासाठी शहरात सर्वत्र विनापरवानगी केबलचे जाळे विणले आहे. शहरातील झाडांवर आणि विजेच्या खांबावर केबल टाकण्यात आल्या आहेत. या केबल तुटून काही वेळेस खाली पडतात किंवा भररस्त्यात लोंबकळत असतात. यामुळे अपघात होऊन एखाद्या नागरिकांच्या जिवावर बेतण्याची शक्यता नाकारता येत नाही.

“पुणे महापालिकेच्या धर्तीवर शहराचा देखील सर्व्हे करण्यात येणार आहे. विनापरवाना केबल पुरवठाधारकावर कारवाई करण्याचे नियोजन केले आहे. पण त्याविषयी धोरण आणि नियमावली ठरविण्यात येणार आहे. त्यानंतर कारवाई करण्यात येणार आहे.”
सहशहर अभियंता, विद्युत विभाग.
- - **बाळासाहेब गलबले,** मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद

# असंघटित, कष्टकरी कामगारांची पिळवणूक कधी थांबणार?

## सुविधांचा अभाव : स्वस्त प्रवासी वाहतूक, नाष्टा, भोजन व आरोग्य सेवेची अपेक्षा

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी चिंचवड, तळेगाव, चाकण, मुळशी व हिंजवडी आदी औद्योगिक, आयटी क्षेत्रात मोठ्या संख्येने असंघटित कामगार काम करत आहेत. त्यांना अनेक वेळा कंत्राटी ठेकेदार किमान वेतन अथवा वेतनच देत नाही. त्यामुळे त्यांची पिळवणूक होते. महाराष्ट्राच्या दुष्काळी, ग्रामीण भागातून विशेषतः मराठवाडा, विदर्भ, खानदेश, कोकण येथून व उत्तरप्रदेश, बिहार, आंध्र, तेलंगण, उत्तर कर्नाटकातील पुरुष, महिला मजूर, स्थलांतरित वर्गाची मोठी लोकसंख्या पुणे, पिंपरी चिंचवड शहरात व चाकण, तळेगाव, रांजणगाव या औद्योगिक पट्ट्यात आहे. विविध ठिकाणी सुमारे ९ लाख 'ईएसआय' नोंदणीकृत असंघटित कामगार कामाला जात आहेत.**

स्वतःच्या मालकीचे घर नसलेले हे मजूर बांधकाम, रस्ते विकास, स्थापत्य संबंधित कामात आहेत. शहरातील विविध ठिकाणी मजूर अड्डे, नाके या ठिकाणी गवंडी काम, वाळू, मातीकाम, बिगारी अशी त्यांची ओळख आहे. वीटभट्टीवर काम करणारा मजूरही असंघटित आहे. पुणे जिल्ह्यात औद्योगिक क्षेत्रात सुमारे १५ हजारांपेक्षा जास्त लघु, सूक्ष्म, मध्यम उद्योगात तरुण कामगारांची संख्या सर्वात जास्त आहे. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर प्रथमच भारत सरकारच्या श्रम व रोजगार मंत्रालयाने भारताच्या इतिहासात सुमारे ३८ कोटी असंघटित कामगारांची नोंदणी करण्यासाठी एक प्रणाली तयार केली आहे. त्यावर शेतमजूर ते शहरातील शिवणकाम, पथविक्रेते यांची असंघटित म्हणून ऑनलाइन नोंदणी सुरू झाली आहे. आजमितीस देशात २८ कोटी ९१ लाख २१ हजार ८७० असंघटित श्रमिकांची नोंदणी झाल्याचा तपशील उपलब्ध आहे. तशी ऑनलाइन ओळखपत्रे त्यांना भारत सरकारकडून मिळालेली आहेत, असे कामगार क्षेत्रातील अभ्यासक क्रांतिकुमार कडुलकर यांनी सांगितले.

आयटीआय, डिग्री, डिप्लोमा, तत्सम प्रशिक्षित कामगारांमुळे मुली मोठ्या कंपन्यांमध्ये उत्पादन साखळीत



(प्रॉडक्शन लाइनवर) काम करतात. विशेषतः वाहन उद्योगातील टाटा मोटर्स, महिंद्रा, बजाज ऑटो, मर्सिडीज आदी नामवंत कंपन्या आणि त्यांच्या पुरवठादार व्हेंडर्स कंपन्यांत १८ ते ३० वयोगटातील मुले - मुली कंत्राटी कर्मचारी म्हणून काम करतात. पुणे, पिंपरी चिंचवड, चाकण औद्योगिक क्षेत्रात हजारो कामगार गेली दोन दशके असंघटित आहेत. वेळेवर वेतन, किमान वेतन, साप्ताहिक सुटी, प्रवास भत्ता, शिक्षण, नाष्टा, भोजन आदी कल्याणकारी सुविधा किंवा महिला, मुली कामगारांना मासिक पाळी, बाळंतपण रजा, मेडिक्लेम आदी अपेक्षा पूर्ण होतील, असे कामगार जीवन त्यांना लाभत नाही. कमी खर्चात कायम कामगारांपेक्षा अतिशय स्वस्त मजूर म्हणून औद्योगिक आस्थापनामध्ये त्यांचे काम सुरू असते. झाडलोट-स्वच्छतेची कामे (हाऊसकिपिंग), कॅन्टीन, बाग बगीचाच, शोरूम, मॉल, गॅरेज, थ्री-टू स्टार हॉटेल्स अशा ठिकाणी असंघटित कामगार अकुशल राहतो. घरेलू कामगारांमध्ये महिलांचे प्रमाण दखल घेण्याइतके आहे. आर्थिक सबलीकरण आदी सर्व काही घोषणा असतात. परंतु; शेवटच्या या कामारांपर्यंत त्या पोहचत नाहीत. चाकण, तळेगाव, शिरूर, मरकळ आदी औद्योगिक वसाहतीमधील कंत्राटी कामगारांना 'ईएसआय'चे सर्वोपचार दवाखाने नाहीत. गेली दहा वर्षे आम्ही ही मागणी करत आहोत. कोरोना काळात खूप अडचणी आल्या. स्थलांतरित कामगार कुटुंबांना खासगी दवाखाने परवडत नाहीत. त्यासाठी फिरते आरोग्य केंद्र आठवड्यातून मोफत सेवा देऊ शकते.

### घराचे स्वप्न अद्याप पूर्ण नाही

रसायन, सिमेंट, स्टील, भंगार, रबर, प्लास्टिक, कोरुगेटेड बॉक्सेस, मसाला पॅकिंग, स्टेशनरी, ड्रायफ्रूट, अन्नधान्य पॅकिंग व्यवसायात किती कामगार असू शकतील याची आकडेवारी उपलब्ध नाही. शहरातील या कामगार कुटुंबांना प्रधानमंत्री आवास किंवा राज्य सरकारच्या इंदिरा आवास योजनेचा लाभ मिळालेला नाही. सरासरी ४ हजार ते ६ हजार रुपयांच्या भाड्याच्या खोलीत राहणाऱ्या कामगारांनी २०१७ पासून अल्पउत्पन्न गटातील प्रधानमंत्री आवास योजनेमध्ये नोंदणी करूनही मालकीच्या घराचे स्वप्न पूर्ण झालेले नाही. शहरात अशी किमान ५० हजार घरे उपलब्ध झाली तर; ३ लाख कामगार कुटुंबाचे कल्याण होईल. कामगारस्नेही निवारा, आरोग्य धोरण नसल्यामुळे सरकारचे 'बहुजन हिताय, बहुजन सुखाय' घोषवाक्य बिनबुडाचे ठरत आहे.

**अनुचित कामगार प्रथा (यूएलपी) या कायद्याच्या आधारे पिळवणूक केली जाते. कायमस्वरूपी कामासाठी मालकवर्ग कंत्राटी कामगाराकडून काम करून घेत असतो. मुळात तात्पुरत्या मुदतीसाठी कंत्राटी कामगार नेमणूक करता येते. कायम उत्पादनात १२ हजारांत राबणारा कामगार नोकरीच्या भीतीमुळे संघटना सदस्य होत नाही. अशा कामगारांचे प्रबोधन करून, गुप्तपणे त्यांची आम्ही संघटना बनवतो. सलग पाच वर्षे एका कंपनीत कंत्राटी असलेल्या कामगारांचे लढे आम्ही यशस्वी केले आहेत. आमच्याकडे १७१ युनिट्स (कंपन्या) आहेत. त्यामुळे कंत्राटी कामगारांनी इच्छाशक्ती दाखवून प्रबोधन करून संघटन करावे. आम्ही त्यासाठी सहकार्य करू.**

**- यशवंत भोसले, अध्यक्ष, राष्ट्रीय श्रमिक आघाडी, पिंपरी.**

---

# गौतमीवरुन वाद, पुण्यातले दोन पाटील एकमेकांना भिडले!

## आ. दिलीप मोहिते पाटील-माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील यांच्यात कलगीतुरा

। पुणे । महाईन्यूज

**प्रसिद्ध नृत्यांगना गौतमी पाटीलवरून हिच्यावरून राजकारण चांगलेच तापताना पहायला मिळत आहे. यावरून आता दोन आमदार दिलीप मोहिते पाटील आणि माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील यांच्यात कलगीतुरा रंगल्याचे पहायला मिळत आहे. गौतमी पाटीलवरून दोन पाटलांमध्ये जुंपली असल्याचे पहायला मिळत आहे.**

दोन दिवसांपूर्वी राष्ट्रवादीचे खेडचे आमदार दिलीप मोहिते पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांनी गौतमी पाटील हिच्या कार्यक्रमाला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या कार्यक्रमापेक्षा जास्त गर्दी होत असते, असा टोला लगावला होता. नृत्यांगना गौतमी पाटील यांना समर्थन देताना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना टोला लगावला आहे.

गौतमी पाटील ऐकत नाही म्हटल्यावर छोटा पुढारी घनश्याम दरोडेनं दिलं ओपन चॅलेंज, लवकरच भेट घेणार




यावर माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील यांनी समाचार घेत खेडचा आमदार दिलीप मोहिते हा एक वादग्रस्त विषय असून मोहितेंनी गौतमीची तुलना राज्याच्या मुख्यमंत्र्यांबरोबर करणे हे चुकीचे आहे. तसेच खेडचे आमदार हे अज्ञानी असून तो वेड्यांच्या नंदनवनामध्ये जगत असल्याचे देखील आढळराव पाटील म्हणाले आहेत. यामुळे आमदार आणि खासदार यांच्यामध्ये चांगलीच जुंपली असल्याचे पहायला मिळत आहे. दिलीप मोहिते पाटील यांनी गौतमी पाटील हिला समर्थन दिले आहे. त्यामुळे गौतमी पाटील हिच्यावरून राजकीय कलगीतुरा चांगलाच रंगला आहे.

यावर गौतमी पाटील हिने यावर प्रतिक्रिया देणे टाळले असून प्रेक्षकांचे माझ्यावर असलेले प्रेम असल्याने माझ्या कार्यक्रमाला गर्दी होत असल्याचे ती म्हणाली आहे. मात्र, येणाऱ्या काळात नृत्यांगना गौतमी पाटील ही राजकारणात एन्ट्री करणार का, हे पाहणे देखील तितकेच महत्त्वाचे आहे. राजकीय व्यक्तींमध्ये चांगलाच कलगी तुरा रंगला असून येणाऱ्या काळात गौतमी पाटील राजकारणात प्रवेश करणार की नाही, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

# सार्वजनिक पदपथच दिले चक्क भाडेतत्त्वावर!

## अतिक्रमण करून लाखोंची कमाई, वाकड-थेरगाव भागात गोरखधंदा तेजीत

। पिंपरी-चिंचवड ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**आयटी हबमुळे थेरगाव-वाकड या उपनगरांसह हिंजवडी प्रचंड विस्तारली. वाढत्या शहरीकरणामुळे येथील रस्ते वाहनांच्या वर्दळीने ओसंडून वाहत असताना येथील पदपथ देखील अतिक्रमणाने व्यापले आहेत. त्यामुळे नाइलाजाने पादचाऱ्यांना जीव मुठीत धरून रस्त्यावरूनच ये-जा करावी लागत आहे. काही ठिकाणी पदपथ चक्क भाड्याने देवून तेथे लाखोंची कमाई केली जात आहे.**



महापालिकेने नागरिकांसाठी कोट्यवधी रुपये खर्चून पदपथ उभारले आहेत. मात्र, प्रत्यक्षात ते गायब झाले असून, ही फुकटचे पदपथ भाड्याने देऊन काहीजण फुकटात मालामाल होत आहेत. वाकड-थेरगाव भागात हा गोरखधंदा तेजीत आहे. अनेक रस्त्यांवरील पदपथावर व्यावसायिकांनी आपले साहित्य टाकून ते अडविले आहे. काहींनी तर पदपथ म्हणजेच जणू त्यांच्या ग्राहकांची अधिकृत पार्किंग असल्याची खात्री दिल्याने वाकड-थेरगावमधील रस्ते आणि पदपथ वाहनांच्या पार्किंगने व्यापले आहेत.

थेरगाव मधील डांगे चौक, १६ नंबर, गुजर नगर, पवार नगर, साईनाथ नगर, थेरगाव गावठाणचा काही भाग, आनंदवन, मंगल नगर, गणेश नगर, शिवकॉलनी यासह विविध भागात पदपथ गायब झाले असून, त्यावर भाजीपाला, फळे, खाद्य विक्रेते, पान टपरी, पंक्चर, खेळणीवाल्यांनी बस्तान मांडले आहे. वाकडमधील उत्कर्ष चौक, विनोदेनगर चौक, पिंक सिटी रस्ता, विविध रस्ते व चौक व्यावसायिकांच्या अतिक्रमणामुळे जणू पदपथ मुक्त झाले आहेत.

हिंजवडी - हिंजवडीतील प्रमुख रस्तेच अतिक्रमणाने व्यापले आहेत. तिथे पदपथांचा विषयच येत नाही. त्यामुळे वाहनांना होणाऱ्या त्रासासह पादचाऱ्यांची मोठी अग्निपरीक्षा येथे सुरू असते. हिंजवडी वाहतूक पोलिसांनी पदपथ गिळंकृत करणाऱ्या तब्बल शंभर विक्रेत्यांना हटविले आहे. यापूर्वीही अनेकदा एमआयडीसी, स्थानिक पोलिस, ग्रामपंचायत संयुक्त कारवाई करून ही अतिक्रमणे हटवितात. मात्र, लाखोंचे भाडे कमाविण्याची सवय लागल्याने पुन्हा काही दिवसांतच 'जैसे थे' परिस्थिती होते.

> सातत्याने अतिक्रमण विरोधी कारवाई सुरू आहे. अशा कारवाईत संबंधित विक्रेत्याचा गाडा, टपरी आणि विक्रीचे साहित्य जप्त केले जाते. काही दिवसांनी विहित दंड आकारून सोडले जाते. परिसर मोठा असल्याने कधी कधी फिरून कारवाई करण्यास थोडा वेळ लागतो.
>
> **- अरुण सोनकुसरे,**
> कार्यालयीन अधीक्षक, अतिक्रमण विभाग, 'ड' प्रभाग

---

# चिंचवड परिसरात पाणीपुरवठा खंडित

## पाणी पुरवठा विभागाच्या निष्क्रिय कारभाराचा सामाजिक कार्यकर्ते मारुती भापकर यांच्याकडून जाहीर निषेध

। पिंपरी । महाईन्यूज

**महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाच्या वतीने दिवसाआड होणारा पाणीपुरवठा बुधवारी (ता. ३१) सकाळी चिंचवड परिसरात झालाच नाही. त्यामुळे या विभागाच्या गलथान व निष्क्रिय कारभाराचा जाहीर निषेध सामाजिक कार्यकर्ते मारुती भापकर यांनी केला आहे.**

पाणीपुरवठा विभागाने आकुर्डी टाकीवरील व्हॉल्व खराब झाल्याने आकुर्डी टाकीवरील मोहननगर, रामनगर महात्मा फुलेनगर, काळभोरनगर, विद्यानगर, दत्तनगर, शंकरनगर, परशुरामनगर, आण्णासाहेब मगरनगर, इंदिरानगर, आनंदनगर, साईबाबानगर, चिंचवड स्टेशन या भागातील पाणीपुरवठा सकाळी दहापर्यंत होणार आहे, असे पाणीपुरवठा विभागाने जाहीर केले. जाहीर केलेल्या वेळेत पाणीपुरवठा सुरू झाला नाही. त्यानंतर दुपारी एक वाजता पाणी सोडण्यात येईल, असे सांगण्यात आले. मात्र, दुपारी एक वाजताही पाणी आलेच नाही. आता संबंधित अधिकारी आणखी अडीच-तीन तास म्हणजे सायंकाळी पाच ते सहा दरम्यान पाणी सोडण्यात येईल, असे सांगत होते.

सध्या उन्हाळ्याचे दिवस असून मागील दोन दिवसांपासून नागरिकांना



पाणी मिळाले नसल्याने सर्वच प्रकारच्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागातील अधिकाऱ्यांचा कुठलाही ताळमेळ नसून गलथान व निष्क्रिय कामाचा नागरिकांच्यावतीने भापकर यांनी तीव्र निषेध व्यक्त केला आहे. संबंधित पाणीपुरवठा विभाग प्रमुख व त्यांच्या प्रशासनाने गलथान व निष्क्रिय कारभारात सुधारणा करावी, अन्यथा तीव्र आंदोलन करावे लागेल व याची संपूर्ण जबाबदारी पाणीपुरवठा प्रशासनाची असेल, असा इशारा भापकर यांनी दिला आहे.

---

# डिलिव्हरीकरिता सोसायटीत जायचा आणि सायकली चोरून 'ओएलएक्स'वर विकायचा

। पिंपरी । महाईन्यूज ।




साहित्य घरपोच करण्यासाठी (डिलिव्हरी) गृहनिर्माण सोसायटीमध्ये गेल्यानंतर पाळत ठेवून सायकली चोरून 'ओएलएक्स' ॲपवर जाहिरात देऊन विक्री करणाऱ्या डिलिव्हरी बॉयला वाकड पोलिसांनी अटक केली.राहुल रविंद्र पवार (वय २५, रा. काळेवाडी) असे अटक केलेल्या डिलिव्हरी बॉयचे नाव आहे. याबाबत संदीप दिगंबर तांबे (वय ४३, रा.रहाटनी) यांनी वाकड पोलीस ठाण्यात फिर्याद दिली होती.

आरोपी राहुल हा साहित्य घरपोच करण्याचे काम करतो. साहित्य देण्याच्या बहाण्याने तो सोसायटीमध्ये जायचा आणि सायकलीवर पाळत ठेवत होता. वेळ मिळाल्यानंतर तो सायकली चोरत होता. 'ओएलएक्स' ॲपवर जाहिरात देवून लोकांना विकत होता. आरोपी राहुल चोरीची सायकल विकण्यासाठी तापकीर मळा येथे येणार असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानुसार पोलिसांनी सापळा रचून त्याला ताब्यात घेतले. त्याच्याकडून ८५ हजार रुपये किंमतीच्या सहा महागड्या सायकली जप्त करण्यात आल्या आहेत.

# थोडे तुम्ही समजदार व्हा; थोडे आम्ही विवेकी होतो




कट्टरता कोणत्याही समाज जीवनाची आणि जगण्याचीही गरज नसताना केवळ प्रतिक्रिया म्हणून तिचा वापर होत असेल तर त्या कृतीने प्रत्येकाचे वर्तमान उध्वस्त झाल्याशिवाय राहणार नाही. हिंदू-मुस्लिम वादाचा विचार करताना दोन्ही समाजातील जिवंत हृदयाच्या आणि शाबूत डोक्याचा लोकांनी आता तरी मौन सोडले पाहिजे नाहीतर निर्णायक वेळी तुम्ही मूग गिळून गप्प होतात आणि आमचे भविष्य राखरांगोळी होताना बघ्याची भूमिका घेत होतात हे पुढल्या पिढ्यांचे शिव्याशाप निमूटपणे ऐकावे लागतील. कुणाच्या तरी राजकीय पोळ्या शेकण्यासाठी हाडामासाच्या लोकांच्या आयुष्याची होळी नका करू. चर्चा आणि संवादाची दारे सदैव उघडी ठेवून मुस्लिम शिक्षितांना म्हणावेसे वाटते की थोडे तुम्ही समजदार व्हा ,थोडे आम्ही विवेकी होतो. चला संवादाचा मजबूत सेतू निर्माण करू या ..

लोग तुट जाते है एक घर बनाने में तुम तरस नही खाते, बस्तिया जलाने में

भाजपला मतदारांना ज्या ज्या वेळी सांगण्यासारखे काहीच नसते त्या त्या वेळी हिंदू-मुस्लिम हे खास ठेवणीतील हत्यार बाहेर काढले जाते आणि कोणत्याही निवडणुका एकहाती जिंकल्या जातात हा भाजपचा नेहमीचा सर्व राहिलेला आहे. त्याला आपल्याकडील मुस्लिम सक्रियपणे पाठिंबा देतात आणि मग आगामी पाच वर्ष भाजपच्या नावाने बोटे मोडत बसतात. मुस्लिमातील कट्टर घटक जसे इस्लामी सुन्नत चालवण्याचा आग्रह करीत अशी पावले उचलतात की त्याचा राजकीय फायदा भाजपला आयताच घेता येतो. ज्या भागात मुस्लिमांची जास्त घरे आहेत त्या ठिकाणी कारण नसताना मुस्लिम एकता दाखविण्याच्या नादात तो परिसर असंख्य झेंड्यानी हिरवा केला जातो मग त्याला प्रत्युत्तर म्हणून हिंदू आपल्या उत्सवाचे निमित्य शोधत तोच परिसर भगवा करायला लागतात. पुढे विविध रंगांच्या झेंड्यांची



खुन्नस सुरु होते आणि माणसांच्या रक्ताने तिचा अभिषेक केला जातो.

सरसकट हिंदू किंवा मुसलमान वाईट आणि चांगले असू शकत नाहीत. दोन्ही कंदील काही प्रवृत्ती वाईट कामे करीत धार्मिक कट्टरतेला सतत प्रोत्साहन देत असतात. मानवता, बंधुभाव आणि प्रत्येकाच्या सामाजिक स्वातंत्र्याचा आदर करणारे लोक दोन्हीकडे असतात मात्र दुर्दैवाने त्यांची संख्या मोठी मर्यादित असते अलीकडे असा विचार करणारे लोक दोन्ही समाजात दुर्मिळ होत आहेत ही सगळ्यांसाठी चिंतेची बाब आहे. मानवता आणि बंधुभावाचा विचार करणाऱ्या मोजक्या लोकांना आणि त्यांच्या मतांना अलीकडे त्या समाजात काडीचीही किंमत दिली जात नाही कारण असे लोक सामाजिक ,धार्मिक करापासून स्वतःला अलिप्त ठेवायला लागले आहेत. समाज कोणताही असो ज्या व्यक्ती लोकांमध्ये मिसळत असतात त्यांच्या बोलण्याला समाजात वजन असते ,अलीकडे अशी वजनदार माणसे समाजात मिसळण्यात काढता पाय घ्यायला लागल्याने समस्या वाढल्या आहेत.

मुस्लिमातील काही खोडसाळ घटक आपल्या परिसरातील हिंदूंशी चांगले वागतात असे नाही ते नेहमी त्यांचा द्वेष करण्यात स्वतःचे रक्त आटवत असतात. त्यात बाहेरून येणारे अनेक धर्मप्रसारक भर घालताना दिसतात. अलीकडे हिंदू मुस्लिम परस्परांना एकमेकांच्या सणाच्या साध्या शुभेच्छा सुद्धा देताना दिसत नाहीत मग घरी जाणे तर दूरच याचे कारण बाहेरून येणाऱ्या कट्टर धर्म प्रसारकांची भडकाऊ व्याख्याने असतात ,हे दोन्ही बाजूला घडू शकते. जिथे मुस्लिमांची संख्या जास्त होते आणि हिंदू अल्पसंख्येत यायला लागतात त्या भागात जाणीवपूर्वक इतरांना त्रास द्यायला सुरुवात होते आणि इतर धर्मीय रोजच्या भांडणे किंवा असुरक्षित वातावरणाला कंटाळून परिसर सोडायला सुरुवात करतात. मुस्लिमातील मूठभर समजदार लोकांना हे कळत असते त्यांना असे कृत्य पटतही नाही मात्र त्यांचे घरातला कट्टर तरुण मुलगाही ऐकत नसतो अशी सध्या स्थिती झाली आहे.

अकोला शहरातील ज्या हिंदुबहुल भागात शिक्षित मुस्लिम कुटुंब राहतात त्यांना कधीतरी मोठ्या मुस्लिम वस्तीमधील लोकांनी जाऊन विचारले पाहिजे की मुस्लिम म्हणून तुम्हाला या भागात कधीतरी त्रास झालाय का ? त्याचे उत्तर नक्कीच नाही हेच असेल याची आम्हाला खात्री आहे मग मुस्लिमबहुल भागात असणाऱ्या इतर धर्मियांना जीव मुठीत घेऊन का जगावे लागते याचाही विचार या निमित्याने विचार करणाऱ्या मुस्लिमांनी नक्कीच केला पाहिजे. सिनेमा,पुस्तके किंवा कट्टर भाषणे ऐकून शेजाऱ्याला नक्कीच वाचता येणार नाही त्यासाठी त्याच्याशी संवाद वाढवावा लागेल, आपापला धर्म किंवा धर्मग्रंथ काय म्हणतात यापेक्षा हाडामासाची माणसे काय म्हणतात याचा अनुभव घ्यावा लागेल ,त्यासाठी प्रत्येकाच्या डोक्यात चालणार आणि विचार करणारा मेंदू दिला आहे त्याचा वापर करूनच रोजच्या जगण्यातील प्रश्न सोडवायला हवेत.

दोन्ही बाजूने सामाजिक सौहार्दाचे दुश्मन टपून बसलेले आहेत ,एकाच घरात भिन्न मतांचे लोक नांदत आहेत अशावेळी समजदार लोकांच्या विवेकाची परीक्षा असते त्यांना महत्व कशाला द्यायचे आहे याचा निर्णय घेऊन समाजात काम करायचे असते. लक्षात घ्या कट्टरतेची फळे आपल्याच बांधवांच्या रक्तात भिजलेली असतात आणि सामंजस्य नेहमीच मानवतेला अधिक उन्नत करणारे तत्व असते.

## संपादकीय »

### उत्सवाची रोमांचक सांगता

***'दैव माझ्यावरही प्रसन्न होते; पण देवाने आज त्याच्या झोळीत जास्त टाकले,' ही हार्दिक पंड्याची अंतिम सामन्यानंतरची प्रतिक्रियाच 'इंडियन प्रीमियर लीग'च्या (आयपीएल) सरत्या मोसमात काय घडले ते सांगण्यास पुरेशी आहे. हार्दिकचे हे उद्गार महेंद्रसिंह धोनीबाबत होते.***

चेन्नईने खास त्यांच्या शैलीत खेळ केला. अखेरपर्यंत हार मानायची नाही, चिकाटी दाखवून प्रतिस्पर्ध्यांना चुका करण्यास भाग पाडायचे, ही चेन्नईची खास शैली आहे. आयपीएल लिलावात जे खेळाडू दुर्लक्षित असतात, त्यांना 'स्टार' करणारी ही स्पर्धा असते. शूरांना नशिबाचीही साथ लाभते, असे म्हणतात. धोनीने नाणेफेक जिंकली, तेव्हा पावसाची शक्यता होती. चेन्नईची खेळी सुरू झाली आणि पाऊस आला. खेळपट्टीच्या शेजारचा भाग खराब झाला. तो सुकवताना मूळच्या खेळपट्टीतील जानच निघून गेली. त्याचबरोबर, चेन्नईला कमालीचा आक्रमकता २० नव्हे, तर १५ षटकेच दाखवायची होती. केला तो भक्कम फलंदाजीच्या जोरावर. मात्र, यात फायदा झाला तो लिलावात नाकारलेल्या खेळाडूंचा.


**असे म्हणतात की " छोटी सोच और पैर की मोच इन्सान को आगे बढने नाही देती" , छोटी सोच हा फारच व्यापक शब्द आहे. तो एवढा व्यापक आहे की कोणत्याही प्रसंगात त्याचा वापर केला जातो. राजीव गांधींच्या काळात " बोफोर्स " शब्द एवढा गाजला होता की लोक त्याचा विविध अर्थाने वापर करीत असत. कुणी भ्रष्टाचार केला तरी बोफोर्स,कुणाची भानगड असली तरी बोफोर्स,कुणी फसवला गेला तरी बोफोर्स. वऱ्हाडीत जसा " जांगळबुत्ता " हा शब्द वापरला जातो ना, तसाच हा शब्द त्याकाळी वापरला गेला होता.**

## पूर्वग्रह मेंदू अधू करतो ...

कुणाला एखाद्या क्षेत्रातील फारशी माहिती नसली तरी " छोटी सोच" हा शब्द हमखास वापरला जातो. कुणी जातीपातीचा विचार केला तरी त्यासाठी "छोटी सोच" हाच शब्द वापरला जातो. जाऊ द्या तुम्हाला अर्थ समजला असेल की व्यक्तीच्या प्रगतीत अश्या प्रकारचा विचार अडथळा असते. थोडक्यात माणसाने नेहमी व्यापक विचार करायला हवा. जिंदगी लंबी नही बडी होनी चाहिये आठवला ना डायलॉग ...

प्रत्येकाला जगातले सगळेच ज्ञान असेल असे नसते ,फार मोजके लोक असे असतात की ज्यांना असंख्य क्षेत्रातील जुजबी ज्ञान,माहिती असू शकते. इतरांना आपल्या रोजच्या समस्यांचा निपटारा करताना वेळच मिळत नाही हे वास्तव मान्य करून पुढे चालावे लागते. ९० टक्के लोक तयार म्हणजे आयत्या उपलब्ध होणाऱ्या गोष्टींवर भरवसा ठेवतात, त्यांना कुणीतरी हा सगळा मालमसाला रेडिमेड आणून द्यावा लागतो,स्वतः मेहनत करून काही करण्याची त्यांची तयारी नसते. असे लोक परावलंबी असतात,नेहमी कुणावर तरी अवलंबून असतात. कुणीतरी एखादी गोष्ट सांगितली की त्यावर यांचा सिमेंटच्या रस्त्यासारखा पक्का भरवसा बसतो. उरलेले मूठभर लोक मात्र कुणी काहीही सांगो ,स्वतः तपासणी ,अभ्यास केल्याशिवाय कशावरही भरवसा ठेवायला तयार नसतात. स्वतः मेहनत घेतात आणि कुणाच्याही बाबत पूर्वग्रह करून घेत नाहीत ,म्हणजे एखाद्याला न भेटता तो असा किंवा तसा आहे हे मानत नाहीत. ९० टक्के लोकांना परस्पर ग्रह करून देता येतो.

"मेंढीपळण" असा एक खास शब्द या मोठ्या समूहासाठी हमखास




वापरला जातो. एखाद्या ठिकाणी गेल्याने फायदा कमी आणि तोटाच जास्त होतो हे सांगूनही जे लोक तिथे जायला रांगा लावत असतात त्या समूहाला मेंढीपळण हा शब्द वापरतात. मेंढींच्या कळपात सर्वात पुढे असणारी मेंढी जिकडे जाईल तिकडे इतर सर्व मेंढ्या जातात. सर्वात पुढे असणारी मेंढी जर खड्ड्यात पडली असेल तर मागे असणाऱ्या मेंढ्या सावध होत नाहीत तर सगळ्या खड्ड्यात पडतात म्हणून या कृतीला "मेंढीपळण" असे म्हटले जाते. आपल्या देशात धार्मिक आणि अध्यात्मिक क्षेत्रात हे नियमितपणे घडत असते. त्यावर कितीही खर्डेघाशी करावी तेवढी कमीच आहे. कबिरापासून तर गाडगेबाबा पर्यंत सगळ्यांनी घसे कोरडे केले, तुकडोजी बाबाना तर घसा सतत वाजवून घश्याचा कँसर झाला पण आम्ही काही सुधरलो नाही एवढे बहाद्दर लोक आहोत. एखादा आपल्या कानाशी लागला की त्याचे शब्द कायमचे लक्षात ठेवतो. आपले पूर्वग्रह तयार व्हायला असंख्य बाबी कारणीभूत असतात. कुटुंब,संस्कार,शाळा,शिक्षक,मित्र,समाज,पोथ्या,पुराणे,कीर्तन प्रवचन ,सत्संग,पुस्तके ,पारावरच्या गप्पा प्रवासात ऐकलेल्या गोष्टी या सगळ्यांचा मोठा परिणाम आपल्या व्यक्तिमत्वावर होत असतो. स्त्रियांच्या बाबतीत काहीही कळत नसणारे एखादे आजोबा सहज गप्पात सांगून जातात की "घाऱ्या डोळ्यांच्या बायका" मोठ्या पाताळयंत्री असतात.

## ।। अभंगवाणी ।।



अइकाल परी ऐसें नव्हे बाई ।
न संडा या सोई भ्रताराची ॥१॥
नव्हे आराणुक लौकिकापासून ।
आपुल्या आपण गोविलें तें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# स्मृती इराणी 'हरवल्यात!

## केंद्रीय मंत्री राहुल गांधींना लक्ष्य: कुस्तीपटूंनी केलेल्या आरोपांवर भाष्य नाही

। नवी दिल्ली । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**भारतीय कुस्ती महासंघाचे अध्यक्ष ब्रिजभूषण शरण सिंह यांच्याविरोधात कुस्तीपटू २३ एप्रिलपासून आंदोलन करत आहे. यावरून काँग्रेसने बुधवारी ( ३१ मे ) महिला आणि बालविकास मंत्री स्मृती इराणी यांना लक्ष्य केलं आहे. काँग्रेसने स्मृती इराणी हरवल्याचं म्हटलं आहे. यावरून इराणी यांनीही काँग्रेसला प्रत्युत्तर दिलं आहे.**




ब्रिजभूषण सिंह यांच्यावर महिला कुस्तीपटूंनी लैंगिक शोषणाचे आरोप केले आहेत. यावर स्मृती इराणी यांनी कोणतीही प्रतिक्रिया व्यक्त केली नाही आहे. यावरूनच काँग्रेसने दोन ट्वीट करत टीका केली आहे. पहिल्या ट्वीट मध्ये स्मृती इराणी यांचा फोटो ट्वीट करत 'हरवल्याचं' काँग्रेसने सांगितलं आहे.तसेच, दुसऱ्या ट्वीटमध्ये महिला कुस्तीपटूंच्या प्रश्नांवर स्मृती इराणी ट्वीट लपवतात. तर केंद्रीय मंत्री मिनाक्षी लेखी पळून जातात, असं टीकास्र काँग्रेसने डागलं आहे.

स्मृती इराणी यांनी काँग्रेसला प्रत्युत्तर देत राहुल गांधी यांच्या अमेरिका दौऱ्यावरून निशाणा साधला. ट्वीट करत इराणी म्हणाल्या की, "हे दिव्य राजकीय प्राणी, मी नुकतेच सिरसिरा गाव, विधानसभा सलून, लोकसभा अमेठी येथून धुरनपूरकडे निघाले आहे. माजी खासदार शोधत असाल, तर कृपया अमेरिकेशी संपर्क साधा," असा टोला इराणी यांनी राहुल गांधींना लगावला आहे. दरम्यान, मंगळवारी कुस्तीगिरांनी आपली पदके गंगेमध्ये विसर्जित करण्याचा निर्णय जाहीर केला होता. त्यानुसार विनेश फोगट, साक्षी मलिक, बजरंग पुनिया हे कुस्तीगीर संध्याकाळी पदकांसह हरिद्वारच्या गंगा काठावर पोहोचले. त्यांना पाठिंबा देण्यासाठी शेकडो पाठिराखेही हरिद्वारला पोहोचले होते. कुस्तीगीर तासभराहून अधिक काळ पदके हातात धरून बसले होते. प्रत्येकाच्या डोळ्यात अश्रू होते. त्यामुळे वातावरण भावनात्मक झाले होते. या वेळी भारतीय किसान संघटनेचे अध्यक्ष नरेश टिकैत यांनी मध्यस्थीकरून कुस्तीगीरांना पदक विसर्जित करण्यापासून रोखले. टिकैत यांनी कुस्तीगीरांची समजूत काढली आणि त्यांच्याकडून पदके आपल्याकडे घेतली. त्यानंतर सरकारला ब्रिजभूषण यांच्याविरुद्ध कारवाई करण्यासाठी पाच दिवसांची मुदत देत असल्याचे कुस्तीगिरांनी जाहीर केले.

---

## तर भाजपाचा पराभव करणं शक्य", राहुल गांधींचं अमेरिकेत विधान

। पुणे । महाईन्यूज



काँग्रेस नेते राहुल गांधी अमेरिका दौऱ्यावर आहेत. मंगळवारी ( ३१ मे ) कॅलिफोर्निया विश्वविद्यालयातील सिलिकॉन कॅम्पसमध्ये राहुल गांधींनी नागरिकांना संबोधित केलं. तेव्हा राहुल गांधींनी भाजपाबाबत मोठं विधान केलं आहे. "विरोधी पक्ष एकत्रित झाला, तर केंद्रातील भाजपा सरकारचा पराभव करणं शक्य आहे," असं राहुल गांधींनी कर्नाटकचं उदाहरण देत सांगितलं आहे. "मी भा\जपाचा कमकुवतपणा स्पष्टपणे पाहू शकतो. विरोधकांनी युती केल्यास भाजपाचा पराभव होऊ शकतो. कर्नाटक निवडणुकीत काँग्रेसने भाजपावर मात करत पराभव केला, असा समज आहे. पण, कर्नाटक निवडणुकीत काँग्रेसने वेगळ्या दृष्टीकोणाचा वापर केला. 'भारत जोडो यात्रे'च्या माध्यमातून आम्ही विजयाचा पाया रचला," असं राहुल गांधींनी सांगितलं.

"कर्नाटक निवडणुकीत भाजपाने काँग्रेसपेक्षा १० पट अधिक पैसा खर्च केला," असा आरोप करत राहुल गांधी म्हणाले, "विरोधकांच्या एकजुटीसाठी आम्ही काम करत आहोत. पण, भाजपाचा पराभव करण्यासाठी विरोधकांच्या एकजुटीपेक्षा पर्यायी दृष्टीकोणाची गरज आहे." 'भारत जोडो यात्रा' हा पर्यायी दृष्टीकोण बनण्यासाठी पहिला मार्ग होता. या माध्यमातून अनेक विरोधी पक्ष एकत्र आले. कोणताही विरोधी पक्ष 'भारत जोडो यात्रे'च्या विचारांशी असहमत असेल असं वाटत नाही," असेही राहुल गांधींनी सांगितलं. "भाजपा लोकांना धमक्या देत, सरकारी यंत्रणांचा गैरवापर करत आहे. आम्हाला लोकांना जोडण्यासाठी ज्या साधनांची गरज आहे, त्यावर भाजपा आणि राष्ट्रीय स्वयंसेवकर संघाचं नियंत्रण आहे.

## "जर कुस्तीपटूंना योग्य न्याय नाही मिळाला, तर...", राज ठाकरेंचं पंतप्रधान मोदींना पत्र

### मोदींना पत्र लिहित लक्ष घालण्याची मागणी केली

। अंकारा । महाईन्यूज

**भारतीय कुस्ती महासंघाचे अध्यक्ष ब्रिजभूषण शरण सिंह यांच्या अटकेच्या मागणीसाठी २३ एप्रिलापासून कुस्तीपटू जंतर-मंतरवर आंदोलन करत आहे. पण, २८ मेला नव्या संसद भवनासमोर आंदोलन करण्यासाठी जाणाऱ्या कुस्तीपटू आणि पोलिसांमध्ये मोठा राडा झाला होता. त्यानंतर ३० मे कुस्तीपटू आपली पदकं गंगेत विसर्जित करण्यासाठी हरिद्वार येथे गेले होते. अशातच मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींना पत्र लिहित लक्ष घालण्याची मागणी केली आहे.**



"आपण ह्या विषयांत लक्ष घालावं अन्..."

"म्हणूनच जर त्यांना योग्य न्याय नाही मिळाला तर कुठल्या खेळाडूला स्वतःच्या रक्ताचं पाणी करून देशासाठी पदक मिळवावं असं वाटेल? आपल्या देशातील सरकारला जर आपल्या दुखाची पर्वा नाही असं चित्र उभं राहिलं तर 'खेलो इंडिया' हे स्वप्नच राहील. जर आपण खेळाडूंना देशाचा गौरव म्हणत असू तर मग त्यांची २८ मे ला ज्या पद्धतीने फरफट झाली तशी फरफट होणार नाही आणि त्यांचं म्हणणं ऐकून त्यांना आश्वस्त केलं जाईल इतकं तर आपण नक्कीच कराल ह्याची मला खात्री आहे. आपण ह्या विषयांत लक्ष घालावं आणि ह्या विषयात तोडगा काढावा

राज ठाकरे म्हणाले की, "सन्मा. भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी जी, ज्यांचा गौरव आपण 'देश की बेटियाँ' असा करत आलो, ज्यांच्या श्रमातून आपल्या देशाला कुस्तीच्या खेळात अनेक पदकं बघायला मिळाली असे कुस्तीपटू न्यायासाठी आक्रोश करत असताना २८ मे ला ज्या पद्धतीने त्यांची जशी फरफट झाली तशी फरफट पुन्हा होऊ नये. तसंच आपण स्वतः ह्या विषयांत लक्ष घालून त्यांचं म्हणणं ऐकून घ्यावं आणि सन्मानजनक तोडगा काढावा व भारतीय क्रीडाजगताला आश्वस्त करावं, ही नम्र विनंती." पत्रात राज ठाकरेंनी म्हटलं की, "सस्नेह जय महाराष्ट्र, आज तुमचं एका महत्त्वाच्या विषयाकडे लक्ष वेधून घेण्यासाठी हा पत्रप्रपंच. खरं तर, लक्ष वेधून घेणं हे तेव्हा म्हणता येईल जेव्हा तुम्हाला त्या विषयाची पुरेशी माहिती नसेल तर. पण आपणांस हा विषय माहीत आहे हे नक्की, त्यामुळे आता 'प्रधानसेवक' ह्या नात्याने आपण ह्या विषयाकडे लक्ष द्यावं ही विनंती. ज्यांचा गौरव आपण 'देश की बेटियाँ' असा करत आलो आहोत आणि ज्यांच्या श्रमातून आपल्या देशाला कुस्तीच्या खेळात अनेक पदकं बघायला मिळाली आहेत, त्या महिला कुस्तीपटू गेले कित्येक दिवस त्यांच्या मागण्यासाठी दिल्लीत आक्रोश करत आहेत." "रेसलिंग फेडरेशन ऑफ इंडियाच्या अध्यक्षांनी त्यांचा लैंगिक छळ केल्याची तक्रार आहे. अशा परिस्थितीत आपल्याला न्याय मिळावा, आणि ह्या लढाईत कोणाच्याही 'बाहुबला'चं दडपण किंवा अडथळा येणार नाही इतकीच त्यांना खात्री सरकारकडून हवी आहे, म्हणजे अर्थात आपणाकडून हवी आहे.

# सलमानचे सुपरहिट चित्रपट

बॉलिवूडचा भाईजान अभिनेता सलमान खानचा आज 57 वा वाढदिवस आहे. 27 डिसेंबर 1965 रोजी इंदूर येथे सलमानचा जन्म झाला होता. वयाच्या 23 व्या वर्षी सलमानने बॉलिवूडमध्ये बीवी हो तो ऐसी या चित्रपटातून पदार्पण केलं. तेव्हापासून आजपर्यंत सलमानचे करोडो चाहते आहेत. लहान मुलांपासून ज्येष्ठांपर्यंत अनेकजण सलमानच्या स्टाईलचे चाहते आहेत.

1989 साली 'मैने प्यार किया' हा सलमानचा पहिला मुख्य भूमिका असलेला चित्रपट होता. या चित्रपटात त्याच्यासोबत अभिनेत्री भाग्यश्री होती. आजही या चित्रपटाचे लाखो चाहते आहेत.

हम आपके है कौन- सलमान खान की फिल्म 'हम आपके हैं कौन' के 25 साल हुए पूरे, जानें प्यार और रिश्तों का मतलब समझाने वाली फिल्म की **कुछ खास बातें**

1994 साली प्रदर्शित झालेल्या 'हम आपके है कौन' चित्रपटाने सलमानला अधिक लोकप्रियता मिळाली. या चित्रपटात अभिनेत्री माधुरी दीक्षित देखील मुख्य भूमिकेत होती.

**करण-अर्जुन**- 1995 साली प्रदर्शित झालेल्या 'करण-अर्जुन' या चित्रपटात अभिनेता शाहरुख खान देखील मुख्य भूमिकेत होता. या चित्रपटातील करण-अर्जुनची जोडी आजही प्रेक्षकांच्या स्मरनात आहे. **जुडवा** - करिश्मा कपूर की फिल्म 'जुड़वा' के रिलीज के 25 साल हुए पूरे, खास अंदाज में एक्ट्रेस ने जाहिर की खुशी - 1997 साली प्रदर्शित झालेल्या 'जुडवा' चित्रपटामध्ये सलमानने दोन भूमिका साकारल्या होत्या. या चित्रपटात त्याच्या सोबत अभिनेत्री करिश्मा कपूर आणि रंभा होती.

**हम साथ साथ है** - हम साथ साथ है फिल्म से जुड़ी दिलचस्प बातें- 1999 साली प्रदर्शित झालेल्या या चित्रपटात मोठी स्टार कास्ट होती. या चित्रपटाचे आजही चाहते आहेत.

**हम दिल दे चुके सनम - 1999** साली प्रदर्शित झालेल्या या चित्रपटामध्ये सलमानसोबत अभिनेत्री ऐश्वर्या राय बच्चन आणि अजय देवगण देखील मुख्य भूमिकेत होते.



# प्रयोगशील नाट्यनिर्मितीचा यशस्वी प्रयोग !

" गेली पंधरा वर्षे मी फक्त आणि फक्त शिवाजी मंदिरच्या फुटपाथवरच रमलो आहे, मोह होतो प्लाझ्याच्या फुटपाथवर जाण्याचा परंतु सध्या मी त्या मोहाला आवर घातलेला आहे. पण येणाऱ्या काळामध्ये नक्कीच ते शिवाजी मंदिर ते प्लाझ्याच्या फूटपाथमधील साठ फुटाचं अंतर पार करण्याचं धाडस करेन." - नाट्यनिर्माता राहुल भंडारे




सोळा वर्षांपूर्वी त्याची रंगभूमीवर एन्ट्री झाली. कोणत्याही नाटकाचा नायक किंवा लेखक-दिग्दर्शक म्हणून नव्हे, तर मराठी नाटकाचा निर्माता होण्याचे धाडस त्याने दाखवले होते. त्याच्या प्रयत्नांना मैत्रीचे पाठबळ मिळाले आणि राहुल भंडारे या तरुण धाडसी निर्मात्याची 'अद्वैत थिएटर्स' ही नाट्यसंस्था नाट्य निर्मितीच्या क्षेत्रात दिमाखात उभी राहिली. या वर्षाच्या अखेरीस रंगभूमीवर पदार्पण करत असलेले 'थँक्स डियर' हे राहुल भंडारे निर्मित पंचविसावे नाटक आहे.राहुल भंडारे यांना नाट्यनिर्मात्याने विविध विषयांना स्पर्श करणारी नाटकं रंगभूमीवर आणली. त्याने जागो मोहन प्यारे, करून गेलो गाव, प्यार किया तो डरना क्या, मी शारुक मांजरसुंभेकर, टॉम आणि जेरी, एकदा पहावं न करून अशा निव्वळ मनोरंजन करणाऱ्या नाटकांसोबत शिवाजी अंडरग्राऊंड भीमनगर मोहल्ला, ठष्ट, स्टॅच्यू ऑफ लिबर्टी अशा प्रबोधनात्मक नाटकांचेही प्रयोग यशस्वी करून दाखवले. राहुलच्या प्रयोगशील व धाडसी वृत्तीचा दुसरा पुरावा म्हणजे रत्नाकर मतकरी लिखित 'आरण्यक' हे पौराणिक नाटक त्याने 44 वर्षांनंतर पुन्हा एकदा रंगभूमीवर आणले. महाभारतावर आधारित या अभिजात नाटकामध्ये दिलीप प्रभावळकर, रवी पटवर्धन, प्रतिमा मतकरी असे दिग्गज होते. राहुलने 'अलबत्या गलबत्या' आणि 'निम्मा शिम्मा राक्षस' निर्मित करून थांबलेल्या बालनाट्य चळवळीमध्ये प्राण फुंकले. 'अलबत्त्या गलबत्या' बालमित्रांनी तर अक्षरशः डोक्यावर घेतले. त्याचे सहाशेहून अधिक प्रयोग झाले. त्यामुळे राहुलला 'प्रयोगशील नाट्यनिर्माता' म्हणून ओळखला मिळाली. राहुल त्याच्या एकूण प्रवासाबद्दल सांगतो की, " अर्थातच हा प्रवास सोपा नव्हता, संघर्षाचा होता. कॉलेजमध्ये एकांकिका किंवा हौशी नाटकं करत असताना किंवा चळवळीची पथनाट्य करताना कधी वाटलं नव्हतं की, मराठी रंगभूमीवर एक यशस्वी निर्माता म्हणून मी उभा राहीन.

# भर कार्यक्रमात विकी कौशलने कतरिना कैफला घातली होती लग्नाची मागणी

विकी कौशल सध्या त्याच्या आगामी 'जरा हटके जरा बचके' या चित्रपटामुळे चांगलाच चर्चेत आहे. या चित्रपटाच्या निमित्ताने विकी-सारा ही नवी ऑनस्क्रीन जोडी प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. दरम्यान, खऱ्या आयुष्यात विकी कौशलने २०२१ मध्ये बॉलीवूड अभिनेत्री कतरिना कैफबरोबर लग्नगाठ बांधली परंतु, विकी-कतरिनाची पहिली भेट केव्हा झाली याबाबत फार कमी जणांना माहिती आहे.

विकी आणि कतरिना पहिल्यांदा एका अवॉर्ड शोमध्ये भेटले होते असे अनेकदा दोघांनीही सांगितले आहे. पुरस्कार सोहळ्यात विकी सूत्रसंचालन करीत होता तेव्हा त्याने "कतरिना मी तुझा खूप मोठा चाहता आहे... सध्या सगळे जण लग्न करीत आहेत तू सुद्धा एखाद्या चांगल्या विकी कौशलचा शोध घेऊन लग्न का करत नाहीस?" असा प्रश्न करीत अभिनेत्रीला लग्नाची मागणी घातली होती. दोघांचे लग्न झाल्यावर हा व्हिडीओ प्रचंड व्हायरल झाला होता. अनेकांनी या व्हिडीओवर "विकीचे बोलणे कतरिनाने खरे करून दाखवले" अशा प्रकारच्या प्रतिक्रिया दिल्या होत्या. विकीचा हा व्हिडीओ व्हायरल झाल्यावर विकी कौशलने एका मुलाखती दरम्यान याबाबत खुलासा केला होता. विकी म्हणाला, व्हायरल व्हिडीओमधील सर्व डायलॉग स्क्रिप्टेड होते. मला फक्त एवढेच माहीत होते की, कोणतीही अभिनेत्री रंगमंचावर आली तरीही मला हाच डायलॉग बोलायचा होता.

नेमकी त्यावेळी कतरिना आली आणि मी तिला स्क्रिप्टप्रमाणे लग्नाची मागणी घातली. पुढे करण जोहरने 'कॉफी विथ करण' या शोमध्ये कतरिनाला मोठ्या पडद्यावर तुला कोणत्या अभिनेत्याबरोबर काम करायला आवडेल? असा प्रश्न विचारला होता. यावर तिने 'मला वाटते विकी कौशल आणि मी एकत्र स्क्रिनवर चांगले दिसू कारण तो उंच आहे'. यानंतर कालांतराने विकी-कतरिनाच्या मैत्रीचे रुपांतर प्रेमात झाले आणि त्यांनी २०२१ मध्ये लग्नगाठ बांधली.

विकी कौशल सध्या सारा अली खानबरोबर त्याचा आगामी चित्रपट 'जरा हटके जरा बचके'च्या प्रमोशनमध्ये व्यस्त आहे. हा चित्रपट २ जून २०२३ रोजी थिएटरमध्ये प्रदर्शित होणार आहे.



# रोहितला इतिहास घडवण्याची संधी!

## रोहित शर्माच्या नेतृत्वाखाली भारतीय क्रिकेट संघ 7 जूनपासून ऑस्ट्रेलियाविरुद्ध वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपची फायनल मॅच खेळणार

**। नवी दिल्ली ।**
**महाईन्यूज । वृत्तसंस्था ।**

**आयपीएल २०२३ चा हंगाम संपल्यानंतर आता क्रिकेट चाहत्यांची लक्ष आयसीसी वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपच्या फायनलकडे लागले आहे. ही लढत येत्या ७ जूनपासून भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातील ही लढत लंडनच्या ओव्हल मैदानावर होणार आहे. कसोटी क्रमवारीत भारत अव्वल स्थानी तर ऑस्ट्रेलिया दुसऱ्या स्थानावर आहे. या दोन्ही संघातील लढत चुरशीची होण्याची अपेक्षा आहे.**

ब्लॉकबस्टर व्ह्याल्यू डेज-स्वयंपाकघरातील उपकरणांवर



प्रचंड सवलत मिळवा

फायनल मॅचसाठी विराट कोहलीसह अन्य खेळाडूंनी लंडनमध्ये सराव सुरू केला आहे. कर्णधार रोहित शर्मा काल ३० मे रोजी संघात दाखल झाला आहे. WTCची फायनल रोहित शर्मासाठी खास असणार आहे. रोहितला भलेही त्याच्या नेतृत्वाखाली आयपीएलच्या १६व्या हंगामात मुंबई इंडियन्सला विजेतपद मिळून देता आले नाही. पण आता त्याला WTC फायनल मॅचमध्ये इतिहास घडवण्याची संधी आहे.

अंतिम सामन्यात रोहितच्या नेतृत्वाखाली भारताने ऑस्ट्रेलियाचा पराभव केला तर WTC चॅम्पियनशिपचे विजेतपद मिळवणारा तो पहिला भारतीय कर्णधार ठरेल. त्याच बरोबर तो भारताच्या अशा कर्णधारांच्या यादीत स्थान मिळवेल ज्यांनी आयसीसीच्या स्पर्धेचे विजेतपद मिळवले. भारताचा माजी कर्णधार आणि स्टार फलंदाज विराट कोहलीला आयसीसीचे विजेतपद मिळवता आले नाही. आता रोहितला ही संधी मिळाली आहे, ज्याने तो विराटला मागे टाकू शकेल.

फायनल मॅच आधी रोहित शर्माने संघाचे टेन्शन वाढवले आहे. रोहित शर्माचा फॉर्म फार चांगला नाही. आयपीएलमध्ये त्याने २०.७५च्या सरासरीने ३३२ धावा केल्या आहेत. अर्थात हे अपयश विसरून रोहित दमदार कामगिरी करेल अशी चाहत्यांना आशा आहे. रोहितचा फॉर्म हा काळजीचा विषय असला तरी शुभमन गिल, विराट कोहली, अजिंक्य रहाणे, मोहम्मद शमी, मोहम्मद सिराज आणि जडेजा या खेळाडूंचा फॉर्म चांगला आहे. इतक नाही तर कसोटी स्टार चेतेश्वर पुजाराने काउंटी क्रिकेटमध्ये धावांचा पाऊस पाडला आहे.

### आयसीसी स्पर्धेच्या विजेतेपदाचा दुष्काळ संपेल

**भारताने ऑस्ट्रेलियाचा पराभव करून विजेतेपद मिळवले तर आयसीसी स्पर्धेच्या विजेतपदाचा दुष्काळ देखील संपेल. २०१३ ली धोनीच्या नेतृत्वाखाली भारताने आयसीसी चॅम्पियन्स ट्रॉफीचे विजेतपद मिळवले होते. तेव्हा भारताने इंग्लंडचा पराभव केला होता. त्यानंतर २०१४च्या टी-२० वर्ल्डकपमध्ये भारताचा फायनलमध्ये पराभव झाला. तर २०१५ आणि २०१६च्या स्पर्धेत सेमीफायनलमध्ये पराभव झाला होता. २०१७च्या चॅम्पियन्स ट्रॉफी आणि २०१९च्या वर्ल्डकपमध्येही असेच झाले होते. तर २०२१, २०२२ मधील टी-२० वर्ल्डकपमध्ये भारताची कामगिरी निराशजनक झाली. २०२१च्या पहिल्या WTC फायनलमध्ये भारताचा न्यूझीलंडकडून पराभव झाला होता.**

---

# धोनीवर मुंबईत होणार उपचार; गुडघ्याच्या दुखापतीवर होणार इलाज

**। नवी दिल्ली ।**
**महाईन्यूज । वृत्तसंस्था ।**

**चेन्नई सुपर किंग्जचा कर्णधार एमएस धोनी त्याच्या गुडघ्याच्या दुखापतीमुळे संपूर्ण आयपीएल २०२३ चा सीझन त्रस्त होता. आता यानंतर तो गुडघ्याच्या दुखापतीवर उपचार करण्यासाठी हॉस्पिटलमध्ये भरती होणार असल्याची माहिती समोर येत आहे.**

कॅप्टन कुल धोनीच्या नेतृत्त्वाखाली चेन्नई सुपर किंग्जने तब्बल पाचव्यांदा आयपीएलचे जेतेपद पटकावले आहे. धोनीचे मैदानावर असणं संघाला अधिक बळ देणारं असतं, चाहत्यांच्या प्रेमाखातर धोनी पुढच्या सीझनमध्ये पुन्हा खेळेल असे तो म्हणाला आहे. पण तत्पूर्वी धोनीबद्दल एक मोठी माहिती समोर येत आहे. या संपूर्ण आयपीएल २०२३ च्या सीझनमध्ये चेन्नई सुपर किंग्जचा कर्णधार एमएस धोनीदुखापतीमुळे त्रस्त दिसत होता. आता येत असलेल्या बातम्यांनुसार, गुडघ्याच्या दुखापतीमुळे एमएस धोनीला रुग्णालयात दाखल केले जाऊ शकते. त्याच्यावर काही चाचण्या केल्या जातील, त्यासाठी त्याला कोकिलाबेन रुग्णालयात तपासासाठी जावे लागणार आहे.

एमएस धोनीच्या नेतृत्वाखाली, सीएसकेने सोमवारी खेळल्या गेलेल्या आयपीएलच्या अंतिम सामन्यात गुजरात टायटन्सचा ५ गडी राखून पराभव केला. धोनीच्या नेतृत्वाखाली सीएसकेचे हे पाचवे आयपीएल विजेतपद आहे. यासह चेन्नई सुपर किंग्जने IPL मध्ये सर्वाधिक ट्रॉफी जिंकण्याच्या बाबतीत मुंबई इंडियन्सची बरोबरी केली आहे. अंतिम सामना जिंकल्यानंतर धोनी सेलिब्रेशन करत असतानाही धोनीच्या गुडघ्याला पट्टा होता. धोनीने चाहत्यांना वचन दिले आहे की तो पुढील वर्षीही आयपीएल खेळणार आहे, त्यासाठी त्याला खूप मेहनत करावी लागणार आहे. धोनीला आता त्याच्या फिटनेसवर खूप भर द्यावा लागणार आहे. धोनीला या आठवड्यात रुग्णालयात जावे लागणार आहे आणि गरज पडल्यास त्याला रुग्णालयात भरतीही केले जाऊ शकते. धोनीच्या गुडघ्याबाबत काही चाचण्या होऊ शकतात, ज्यासाठी एमएस धोनी हॉस्पिटलमध्ये दाखल होऊ शकतो.



### धोनीची दुखापत त्रासदायक

**RAVSPORTZ ने आपल्या अहवालात सूत्रांच्या हवाल्याने सांगितले की एमएस धोनीला या आठवड्याच्या अखेरीस कोकिलाबेन धीरूभाई अंबानी हॉस्पिटल आणि मसिअल रिसर्च इन्स्टिट्यूटमध्ये दाखल केले जाऊ शकते. एमएस धोनीला आयपीएल २०२३ दरम्यान गुडघ्याचा त्रास झाला होता, तो अनेक सामन्यांमध्ये देखील या दुखापतीमुळे त्रासात दिसला होता. आयपीएल २०२३ चा अंतिम सामना खेळायला आलेला धोनी बसमधून उतरत असतानाही खूप अडचणीत असल्याचे दिसून आले.**

---

# कुस्तीपटूंच्या समर्थनार्थ आता युनाइटेड वर्ल्ड रेसलिंग

## भारतीय कुस्ती महासंघाला निलंबित करण्याची धमकी

**। नवी दिल्ली ।**
**महाईन्यूज । प्रतिनिधी।**

देशातील कुस्तीपटूंना दिलेल्या वागणुकीचा देशभरात निषेध व्यक्त केला जात आहे. आता कुस्तीपटूंचा हा विरोध आंतरराष्ट्रीय मुद्दा बनला आहे. युनायटेड वर्ल्ड रेसलिंग अर्थात UWW, कुस्तीपटूंची जगातील सर्वोच्च संस्थेने भारतीय कुस्ती महासंघाला बरखास्त करण्याची धमकी दिली आहे. ३० मे रोजी, UWW ने एक निवेदन जारी करून कुस्तीपटूंवरील पोलिस कारवाई आणि त्यांच्या अटकेचा तीव्र निषेध केला. तसेच ब्रिजभूषण शरण सिंह यांच्याविरोधात सुरू असलेल्या तपासाबाबतही निराशा व्यक्त केली.

### गंगा नदीत पदके....

२८ मे रोजी दिल्ली पोलिसांनी ताब्यात घेतल्यानंतर आणि जंतर-मंतरवरील निषेधाच्या ठिकाणाहून काढून टाकल्यानंतर, कुस्तीपटू गंगा नदीत आपली कष्टाने जिंकलेली पदके



विसर्जित करण्यासाठी हरिद्वारला पोहोचले होते. हिंदू संघटनांनीही शेकडो समर्थकांसह 'हर की पौरी' पोहोचलेल्या कुस्तीपटूंना विरोध केला. यावेळी साक्षी, विनेश आणि तिची चुलत बहीण संगीता सुबकती दिसली आणि तिचा नवरा तिचे सांत्वन करण्याचा प्रयत्न करत होता. त्यांच्या समर्थकांनी त्यांच्याभोवती वलय निर्माण केले होते. 'हर की पौरी' येथे पोहोचल्यानंतर सुमारे २० मिनिटे कुस्तीपटू शांतपणे उभे होते. मग ते पदक हातात घेऊन गंगा नदीच्या काठावर बसले. तथापि, दिल्ली पोलिसांनी मंगळवारी सांगितले की ते त्यांना इंडिया गेटवर आंदोलन करू देणार नाहीत कारण ते राष्ट्रीय स्मारक आहे आणि ती निषेध करण्याची जागा नाही.